# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ०४

## इ. १२वी साठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विभागीय मंडळांना सूचना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म नं. १७) ऑनलाईन नावनोंदणी दिनांक १३/०८/२०२४ पासून सुरु करण्यात येत आहे.

यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक सूचना मंडळाच्या संकेतस्थळावर **http://www.mahahsscboard.in** प्रसिध्द करण्यात येत आहेत. नावनोंदणी प्रक्रियेबाबत प्रकटन काढून त्याबाबतची माहिती सर्व विभागीय मंडळांनी संबंधितांना देण्यात यावी.

१ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत.

२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत —

| अ.क्र. | तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. १३/०८/२०२४ ते सोमवार दि. ३०/०९/२०२४ |
| २ | विद्यार्थ्यांनी विलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. ०१/१०/२०२४ ते बुधवार दि. ३०/१०/२०२४ |

३ खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

४ खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून मंडळाची परीक्षा दयावयाची आहे, त्या उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन त्याचा सांकेतांक, शाखा (Stream) विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नाव नोंदणी करावी.

५ इ. १२वीच्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

६ विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २)आधारकार्ड ३)स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव

विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

७ कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

८ संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या ई–मेल आयडीवर पाठविली जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत (print out) काढून घ्यावीत.

९ विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

१० **<u>खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –</u>**

रु. ६००/– नावनोंदणी शुल्क + रु. १००/– प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

रु. २५/– विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

११ संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन/प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच upload केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करुन माहिती/कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज "अपूर्ण" (Incomplete) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्याकडे त्रुटी पुर्ततेसाठी पाठवावयाचे आहे. तसेच इतर परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ठेवावयाचे आहेत.

१२ सदरील काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य/ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे–

**<u>अ) प्राचार्य तथा ज्येष्ठ शिक्षक –</u>**

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यत | रु. १५०/– |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १५०/– + रु. १०/– प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. ५००/– |

**<u>ब) लिपिक –</u>**

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यत | रु १००/– |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १००/– + रु. १०/– प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. २००/– |

१३ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यम व शाखेनुसार (Stream), त्यास उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल, त्यामधील एका उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत

मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, सांकेतांक (index no.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१४ विभागीय मंडळ स्तरावर खाजगी विद्यार्थ्यांचे अर्ज Maker/Checker पध्दतीने तपासावयाचे आहेत. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले अर्ज नेमून दिलेल्या जिल्हा/तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Desk1 user) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील.

१५ संबंधित कर्मचाऱ्यांनी online पध्दतीने प्राप्त अर्ज तसेच कागदपत्रांची पडताळणी करुन स्वतःच्या अभिप्रायासह पात्र/अपात्र/अपूर्ण (Eligible/Non-eligible/Incomplete) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहेत. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यावर संबंधित कर्मचाऱ्याच्या Login मध्ये कार्यवाही पूर्ण केलेल्या अर्जांची एकत्रित यादी (pdf स्वरुपात) काढण्याची सुविधा दिलेली आहे. शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी त्यांच्या Login मधून प्राप्त यादीतील (pdf) सर्व नावनोंदणी अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी करुन सदर यादीवर आपले अभिप्राय नोंदवावे व पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावे, त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जांबाबत अंतिम निर्णय पात्र/अपात्र (Eligible / Non-eligible) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन अर्ज निकाली काढावयाचा आहे. अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Enrollment Certificate तयार होऊन सर्व संबंधित घटकांस त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल, तसेच Enrollment Certificate ची Digital प्रत विद्यार्थ्यांने नोंदविलेल्या e-mail address वर पाठविण्यात येईल.

१६ आपल्या विभागीय मंडळामध्ये खाजगी विद्यार्थी संदर्भात स्वतंत्र शाखा असल्यास त्या संबंधित शाखेस स्वतंत्रपणे संगणक व नेट यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात यावी.

१७ एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्याकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन अंतिम कार्यवाही करावी. अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रु. १००/— वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

१८ सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करुन घेण्यात यावे.

१९ फेब्रु—मार्च २०२३ मध्ये इ. १०वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेब्रु—मार्च २०२५ च्या इ.१२वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास पात्र ठरतील.

२० शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा.

२१ इ. १२वी फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

२२ एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address), शाखा (Stream), माध्यम, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

२३ दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची/UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

२४ **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत.**

२५ ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यास शास्त्र, कला व वाणिज्य शाखेस प्रवेश घ्यायचा असेल, त्या उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

२६ ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आवेदनपत्रासंदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्याबाबत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळामार्फत सूचना देण्यात याव्यात.

२७ परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं. १७ भरला असेल तर, ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्राचा (Eligibility Certificate) अर्ज online पध्दतीने विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

२८ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी प्रत्येक उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादेत (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची तक्रार प्राप्त झाल्यास त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्यात येईल, असे सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

२९ प्रथम नावनोंदणी केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत ५० ची क्षमता वाढविणेसाठी विभागीय मंडळाने संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची लेखी मागणी आल्यानंतर प्रकरणिका सादर करुन विभागीय अध्यक्षांची मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी पत्राद्वारे सचिव, राज्य मंडळ, पुणे – ०४ यांना सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतरच वाढीव मर्यादा मान्य करण्यात येईल. सदरची ही वाढीव मर्यादा या परीक्षेसाठी अंतिम असेल यानंतर विद्यार्थी क्षमता वाढविता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४.

दिनांक – १२/०८/२०२४